# ५. रोकडे पाझर

'**रोकडे पाझरे**' हा एकशे अठ्ठेचाळीस पृष्ठसंख्येचा, तीन प्रदीर्घ लेखांचा संग्रह असून तो २०१० मध्ये दर्या प्रकाशन, पुणे प्रकाशन संस्थेने प्रकाशित केला आहे. याचे स्वरूप 'काचाकवड्या' व 'कैफियत' या संग्रहांपेक्षा भिन्न आहे. 'काचाकवड्या' व 'कैफियत'मधील लेख म्हणजे भोवतालच्या घटनांच्या भूमिनिष्ठ मूल्यदृष्टीतून घेतलेल्या नोंदीतून शब्दबद्ध झालेला मुक्ताविष्कार आहे. त्यात चिंतनाबरोबरच आजच्या मूल्यहीन व्यवस्थेबद्दल चिंताही आहे; पण या '**रोकडे पाझर**'मधून महाराष्ट्राच्या आध्यात्मिक परंपरेतील गुरू-शिष्य परंपरेच्या भावविश्वाचा पुरुष संत आणि स्त्री संत असा शोध घेतलेला आहे. श्रीचक्रधर-महदंबा, संत नामदेव-जनाबाई आणि तुकाराम-बहिणाई या संत गुरू-शिष्यपरंपरेचा हा चिंतनात्मक शोध आहे.

रूढ व्यवस्था नाकारून नवी समतेची व्यवस्था स्वीकारणाऱ्या महानुभाव-वारकरी संप्रदायाच्या या परिवर्तन चळवळीने सर्वसामान्य, दुर्लक्षित समूहास नवे जीवनभान दिले. त्यामुळे एका मोठ्या समूहाला जाग आली. याच प्रवाहातील गुरू-शिष्य परंपरेचा वेध घेऊन लेखक मौखिक प्रवाहांचा सशक्त वापर करणाऱ्या वाङ्मयपरंपरेस उजागर करू इच्छितात. तसेच गुरू-शिष्यांतील निखळ आध्यात्मिक नातेबंधाचे नैसर्गिकत्व उलगडून दाखवितात. मानवतावादी स्त्री-मूल्यात्म दृष्टिकोनाचाही परिचय करून देतात. लेखातून आलेले गुरू लोकसमूहाच्या बहुजन वर्गातील आहेत. ही देशीय समृद्ध परंपरा लेखकास उजागर करावयाची आहे, हे विशेष होय.

तत्कालीन परिस्थितीत कर्मकांडात बुडालेल्या सर्वसामान्यांची वैदिक परंपरेतून सुटका करून त्यांना महानुभाव-वारकरी संप्रदायाने आपल्यात सामील केले, ही एका अर्थाने बंडखोरीच होती. या संप्रदायाने दुर्लक्षित मोठ्या समूहास आपल्यात सामावून घेतले. त्यानिमित्त समूहभावना व्यक्त होऊ लागल्या. याच परंपरेतील ही गुरू-शिष्य परंपरा लेखकांनी अधोरेखित केली आहे. संतांनी आपल्या सहवासात आलेल्या स्त्रियांना प्रेरणा देण्यामागे त्यांचा काय द्रष्टेपणा होता, हे नोंदविताना राजन गवस लिहितात, ''एखाद्या स्त्रीमध्ये परमार्थमार्गावरील, भक्तिमार्गावरील, ज्ञानमार्गावरील आवश्यक सामर्थ्य आढळताच त्यांनी ती केवळ स्त्री आहे म्हणून बाजूला न सारता, आपले पाठबळ त्यांना देऊ केले आणि प्रेरणा, प्रोत्साहन देऊन त्यांच्यामध्ये अस्तित्वात असणाऱ्या सामर्थ्याचा, क्षमतांचा विकास होण्याच्या दृष्टीतून प्रेरकता दर्शविली.''[१] लेखकाचे हे निरीक्षण वास्तवदर्शी आहे. याच प्रेरणेतून या स्त्रियांनी विकास साधलेला आहे. संतपदापर्यंत त्यांची वाटचाल राहिलेली आहे. त्यांच्या हातून मराठी साहित्याच्या प्रारंभकाळीच उत्कृष्ट साहित्यनिर्मिती झाल्याचे दिसते.

समाजाच्या तळागाळापर्यंत, दीन-दलितांपर्यंत पोहोचलेल्या संत चळवळीने सर्व जातिधर्मांतील स्त्री-पुरुषांना कवेत घेतले. यातूनच अतिशय प्रतिकूल परिस्थितीतही या संत स्त्रियांनी अभंगरचनेतून जीवनानुभूती मांडली. ती अनुभूती भक्तिमार्गाची होती. विठ्ठलभक्तीची, तशीच ती गुरुभक्तीचीही

होती. यामागे समाजहिताचा सर्वांगीण विचार मांडणाऱ्या संतांची प्रेरकता महत्त्वाची होती. महानुभाव व वारकरी संप्रदायांतील संतांचे, ''संत स्त्रियांना लिहिते करणे, त्यांना चिंतनाला उद्युक्त करणे, त्यांच्या भावभक्तीचा आदर करणे, हे कार्य विशेषत: लक्षणीय वाटते.''[२] ही महत्त्वपूर्ण नोंद सामान्य स्त्री ते संत हा प्रवास उलगडून दाखविणारी आहे. या संग्रहात एकूण तीन दीर्घ लेख असून, 'तुम्ही अच्युत गोत्र की गा ।' या पहिल्या लेखातून महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधरस्वामी आणि आद्य कवयित्री महदंबा यांच्या गुरू-शिष्यत्त्वाच्या नात्याचा शोध घेतला आहे. लोकजीवनातून चालत आलेल्या प्रकटीकरणाची शक्ती घेऊन आलेल्या ओवीगीताचा वापर करून महदंबेने 'धवळे' लिहिले. हा स्त्रीसाहित्याचा पहिलाच ग्रंथ उत्कृष्ट असून, यात स्त्रीजीवनाचा भावाविष्कार ठासून भरलेला आहे. श्रीचक्रधरांच्या सहवासाचा परिसस्पर्श लाभलेल्या महदंबेने 'धवळे' या कथाकाव्यातून श्रीकृष्ण-रुक्मिणी विवाहगीत जरी श्री गोविंदप्रभूंच्या लग्नप्रसंगी गायिले असले, तरी त्यामागे श्री चक्रधरांकडून श्रीकृष्ण चरित्राचे अनेकवेळा ऐकलेले निरूपण होते. श्रीचक्रधरांनी साहित्यनिर्मिती केली नसली, तरी ते महान जाणकार होते. 'धवळे' निर्मितीप्रसंगी महदंबेस श्रीगोविंदप्रभूंच्या सहवासात पाठविण्यामागे त्यांची एक भूमिका होती : ''महदंबेचे प्रतिभासंपन्नत्व अधिक बहरावे, अशीच ह्या गुरूची त्यामागची धारणा असावी.''[३] श्रीगोविंदप्रभूंनी वातावरणनिर्मिती करून अगदी सहजतेने 'धवळे' रचण्यास प्रेरित केले. सहजतेचा सुंदर भाषाविष्कार या ग्रंथातून झालेला आहे.

श्रीचक्रधरांनी स्त्रियांना मोठ्या आस्थेने वागविले. यासाठी त्यांना त्रासही झाला. महदंबेसारखी शिष्या मिळाली. आऊसा, देवाईसा, इल्हाईसा, लखुबाईसा, बोणाबाई, उमाईसा, देमती, आबाईसा, कामाईसा, एकाईसा यांसारख्या अनेक स्त्रियांनी शिष्यत्त्व पत्करले; पण यात महदंबेचे स्थान सर्वांत वरचे होते. 'धवळ्याशिवाय', 'मातृकी रुक्मिणी स्वयंवर' हे काव्य आणि 'गर्भकांड' या ओव्याही महदंबेने रचलेल्या आहेत. एकूणच ''लिंगभेद जाणिवेशिवाय जगण्याची संकल्पना चक्रधरांना अभिप्रेत होती. वास्तविक ही अगदी उच्च पातळीवर नेणारी मुक्तीची संकल्पना होती.''[४] याच धारणेतून श्रीचक्रधरांच्या सान्निध्याने एक प्रतिभावान कवयित्री मराठी साहित्यास लाभली, याचा योग्य आढावा या लेखातून लेखकाने घेतला आहे.

संग्रहातील 'देठी साकळे विठ्ठल' हा दुसरा लेख वारकरी पंथप्रवर्तक संत नामदेव आणि संत जनाबाई या गुरू-शिष्यांवर आधारित आहे. संत नामदेव हे ज्ञानदेवांचे समकालीन भक्तकवी होत. ते वारकरी संप्रदायातील उत्कट विठ्ठलभक्त म्हणून गणले जातात. संत ज्ञानदेवांसोबत नामदेवांनी तीर्थयात्रा केली. काही काळ एकमेकांच्या सहवासात घालविला. ज्ञानदेवांच्या समाधीनंतर संत नामदेव उत्तरेस निघून गेले. भागवत धर्मप्रचारास वाहून घेतले. त्यांच्यामुळे थेट पंजाबपर्यंत वारकरी संप्रदाय पोहोचला.

संत नामदेवांची अभंगसंख्या विपुल आहे. सुमारे अडीच हजार अभंग त्यांच्या नावावर आहेत. शिखांच्या 'गुरू ग्रंथसाहिब' या धर्मग्रंथात त्यांची ६१ कवने समाविष्ट आहेत. त्यांच्या अभंगांची

भाषा अतिशय उत्कट व कमालीची साधी आहे. अभंगासाठी जनसामान्यांच्या भाषेचा उपयोग त्यांनी केला. वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान व विठ्ठलमहिमा उत्कटपणे त्यांच्या अभंगातून व्यक्त होते.

'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा' ही पांडुरंगमहिमा गाणारी सुप्रसिद्ध आरती संत नामदेवांचीच आहे. ती आजही घराघरांत गायिली जाते. 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।।' हा संदेश देत परमेश्वराच्या नामस्मरणात नामदेवांनी आयुष्य घालविले. त्यांनी सावता माळी, गोरा कुंभार, नरहरी सोनार, चोखामेळा, सेना न्हावी, परिसा भागवत, संत जनाबाई आदी संतांचा मेळा जमविला. विसोबा खेचरकडून गुरूपदेशाने अध्यात्मदीक्षा मिळालेल्या नामदेवाने स्वत:स विठ्ठलभक्तीत झोकून दिले. त्यांच्या कुटुंबीयांनाही नामदेवांमुळे अभंगरचनेची स्फूर्ती मिळू लागली. कुटुंबीयांप्रमाणेच घरची कामे करणारी जनाबाई ही दासीसुद्धा अभंगरचना करू लागली. ही नामयाची दासी संत जनाबाई 'वारकरी संप्रदायातील जाईची वेल' म्हणून गणली जाते. दमा व करंड या शूद्रकुलीन दाम्पत्याची ही अनाथ कन्या बालपणापासूनच नामदेवांचे वडील विठ्ठलभक्त दामाशेठच्या घरी पडतील ती कामे करून जगली. चौदा माणसांच्या कुटुंबाची तिने सेवा केली. नामदेवांच्या सहवासाने तिने अभंगातून विठ्ठलभक्तीचा महिमा गायिला. केवळ नामदेवांच्या गुरुभक्तीमुळे या दासीस उत्कृष्ट भावकविता लिहिता आली. एकूणच संत जनाबाईचे अभंग मराठी संतवाङ्मयाच्या प्रवाहातील 'अलौकिक प्रतिभासंपन्न भावकविता' म्हणून ओळखले जातात.

नामदेवांच्या घरी जमणारा संतमेळा, त्यांच्याशी होणारा संवाद, सतत चालणारे कीर्तन यांतून जनाबाईच्या अंगी आध्यात्मिक धीटपणा आला. तिच्यात विठ्ठलभक्तीचे वेड संचारले. मनोभूमिकेत कमालीचा बदल झाला. काव्यदृष्टी साकारली. 'नामदेवगाथे'त कुटुंबातील सदस्यांसह जनाबाईच्या ३४९ अभंगांचा समावेश आहे. ''जनाबाईच्या कविता म्हणजे मराठी साहित्यातील श्रेष्ठ भावकाव्य ठरते. तिने तिच्या भावभक्तीच्या साहाय्याने घेतलेल्या ईश्वराविषयीच्या साक्षात्कारी अनुभवांचे अंतरंग चित्रित केले आहे.''[५] जनाबाईच्या काव्याचे हे मूल्यमापन योग्यच आहे.

लेखकाने या लेखातून जनाबाई आणि नामदेव, जनाबाई आणि विठ्ठल, जनाबाई आणि समाज अशी परस्परसंबंधांची विविध रूपे उलगडून दाखविली आहेत. जनाबाईचे विठ्ठलाशी संवाद साधणारे अभंग भावस्पर्शी आहेत. ते आत्मपर स्वरूपाचे असून, विठ्ठलाशी 'प्रेमसखा' या नात्याने संवाद साधू इच्छितात. त्यात हळुवारपणासोबतच हळवेपणा आहे. तो नोंदविताना लेखक लिहितात, ''विठ्ठलाशी जनाबाईचे निर्माण झालेले नाते वेगवेगळ्या रंगरूपांनी बद्ध होत जाते. त्याची बहारदार चित्रे तिची कविता दर्शविते.''[६] यातून विठ्ठलाचा होणारा साक्षात्कार मानवी पातळीवर येतो. विठ्ठलाचे सामान्यपण आणि देवत्व उलगडताना जनाबाईच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाची साक्ष ठरते. संत नामदेवांच्या सहवासाने संतपदापर्यंत जाणारा जनाबाईचा प्रवास आश्चर्यकारक ठरणारा आहे.

'आनंद निर्भर मन...' हा या संग्रहातील तिसरा लेख संत तुकोबा आणि त्यांच्या शिष्या बहिणाई (बहेणाई, बहिणाबाई) या प्रतिभासंपन्न गुरू-शिष्यांना उजागर करणारा आहे. संत तुकाराम हे भागवतरूपी मंदिराचा 'कळस' संबोधले जातात. 'वारकरी संप्रदायातील बंडखोर कवी' म्हणून त्यांचा

उल्लेख केला जातो. तुकारामांच्या काव्याचा आवाका खूप मोठा आहे. लेखकाच्या शब्दांत सांगायचे झाले तर, ''संत तुकाराम ही मराठी साहित्यविश्वाला लाभलेली एक अद्भुत देणगी आहे.''[७] हे खरेच आहे. अवघे बेचाळीस वर्षांचे आयुष्य लाभलेल्या तुकारामांनी पाच हजार अभंग लिहिले. ते 'बुडती हे जन। देखवे ना डोळा।।' या आंतरिक तळमळीतून व्यक्त झाले आहेत.

देहू येथे बोल्होबा आणि कनकाई या शूद्रकुलीन दाम्पत्यापोटी तुकारामाचा जन्म झाला. घरची आर्थिक परिस्थिती सधन होती; पण पुढे ही परिस्थिती कायम राहिली नाही. मोठ्या दुष्काळात कुटुंब आणि गावाचीच वाताहत झाली. भोवतालची परिस्थिती पाहून हेलावलेले मन संसारातून उडाले. विठ्ठलभक्ती हाच एक जीवनाधार उरला. सांसारिक आसक्तीने उडालेले मन देहूजवळील डोंगराजवळ जाऊन ईश्वरचिंतनात रमू लागले. ते भक्तिभावनेच्या आधारे आत्मचिंतनात खोल उतरत गेले आणि ''त्या चिंतनामधून जगण्याच्या हजारो तत्त्वांची निर्मिती झाली.''[८] विरक्तीची साधना सुरू झाली. चिंतनातून प्राप्त झालेल्या आत्मानुभूतीतून कीर्तनास प्रारंभ झाला. पाहता-पाहता हजारोंचा जनसमुदाय आकृष्ट झाला.

सतराव्या शतकातील अतिशय प्रतिकूल परिस्थितीतही संत तुकारामांनी संतत्त्व व कवित्त्व उत्कृष्टपणे जपले. 'असाध्य ते साध्य' करून दाखविले. अतिशय संघर्षशील आयुष्य वाट्यास आलेल्या तुकारामांनी कसा विकास साधला, हे नोंदविताना लेखक लिहितो, ''प्रस्थापित ज्ञानव्यवहाराच्या वर्तुळाने शूद्रकुलीन म्हणून झिडकारलेला मनुष्य जेव्हा अधिकारवाणीचा सम्राट होतो, तेव्हा त्या जागेवर स्वत:चे निशाण रोवण्यासाठी वापरलेली साधने कोणकोणती असतात, त्याचा तुकारामांसंदर्भात प्रत्यय घेणे नेहमीच उद्बोधक ठरेल.''[९] हा लेखकाने तुकारामांच्या दिशेने घेतलेला शोध महत्त्वाचा आहे.

साध्या, सहज लोकशब्दांतून व्यक्त झालेल्या भक्तिभावातील सहजता आणि धर्माच्या नावाखाली माजलेल्या दांभिकपणावर प्रहार करताना आलेली प्रखरता हे तुकारामांच्या अभंगाचे खास वेगळेपण लेखकाने नोंदविले आहे. त्यांच्या अभंगात सामाजिक जाण सर्वांगीण स्वरूपाची असून, चिंतनशीलता, विचारप्रवणता त्यात ठासून भरलेली आहे. तुकारामांइतकी विविधता इतरत्र क्वचितच आढळते. हे सर्व अभंग कीर्तनाच्या माध्यमातून रसाळपणे हजारोंच्या जनसमुदायासमोर येत होते. तुकारामांची कीर्ती पसरत होती. याचवेळी तुकारामांची काव्यकीर्ती जयराम स्वामी या कीर्तनकारांकडून ऐकून तुकारामाला आपले गुरुपद बहाल करणारी एक स्त्री होती, ती म्हणजे बहिणाई होय.

संत तुकारामांच्या बहुश्रुत कवित्त्व व संतत्त्वाला केवळ ऐकूणच बहिणाई पाठक या ब्राह्मणकुलीन स्त्रीने तुकारामाला गुरुपद द्यावे, इतके तुकारामांचे प्रतिभासामर्थ्य अफाट होते; पण अतिशय प्रतिकूल काळातील कर्मठ कुटुंबातल्या स्त्रीचा हा आध्यात्मिक प्रवास धाडसाचा आहे, याची विशेष नोंद घेताना लेखक लिहितात, ''एका ब्राह्मणकुळात जन्मलेल्या व्यक्तीने, तेही स्त्रीने तुकारामांसारख्या शूद्रकुळात जन्माला आलेल्या पुरुष व्यक्तीला आपला गुरू करावे, ही त्या काळाच्या मानाने तशी क्रांतिकारक गोष्ट घडली.''[१०] हे विशेष होय. एकंदरीत, लेखकास तुकारामांनी साधलेली अंतरीची

विकसनशीलता, भाषाभिव्यक्ती, आशयसंपन्नता विशेष वाटते. अशा संपन्न संताकडून बहिणाईस कवित्वाचे वरदान मिळते. त्यामुळे 'तुकाराम भेटला धन्य जिणे माझें । कृतकृत्य जाले सहजचि ।' हा नम्र भाव बहिणाईकडून व्यक्त होतो. बहिणाईच्या नावावर एकूण सातशे चाळीस अभंगांची नोंद आहे. हे केवळ तुकारामांसारखा सद्गुरू लाभल्याने शक्य झाले, हा भाव बहिणाईने व्यक्त केला. त्यामुळे ''बहिणाबाई ही कवयित्री तुकारामांमुळे मराठी काव्यविश्वाला लाभली.''[११]

एकंदरीत, संतसहवासाची ऊर्जा घेऊन या तिन्ही शिष्या संतपदापर्यंत पोहोचलेल्या आहेत. यामागे संबंधित संतांनी जाणीवपूर्वक दिलेले प्रोत्साहन होते. त्यांच्या सहवासात आलेल्यांना आध्यात्मिक उन्नतीचे नवे भान प्राप्त करून दिले. कवित्त्वाची बीजे असणाऱ्या महदंबा, जनाबाई आणि बहिणाई यांना संतसंगतीने संतत्त्व प्राप्त झाले, ही प्रचंड क्रांतिकारी घटना आहे. लोकचळवळीतून आलेल्या या महानुभाव-वारकरी संप्रदायांच्या चळवळीने साहित्यनिर्मितीस लोकभाषेचाच आधार घेऊन रुजविलेल्या देशी परंपरेस अधोरेखित करणे, नव्या शोधक दृष्टीतून त्याचा शोध घेणे लेखकास साध्य करावयाचे आहे.

**संदर्भ :**


१. राजन गवस- 'रोकडे पाझर', दर्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१०, पृष्ठ १४

२. तत्रैव- पृष्ठ १५

३. तत्रैव- पृष्ठ ४२

४. तत्रैव- पृष्ठ ५०

५. तत्रैव- पृष्ठ ९२

६. तत्रैव- पृष्ठ ९१

७. तत्रैव- पृष्ठ ९१

८. तत्रैव- पृष्ठ ९१

९. तत्रैव- पृष्ठे १११, ११२

१०. तत्रैव- पृष्ठ ११९

११. तत्रैव- पृष्ठ १२५


---------------------------------